भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०३/२०१७

**१) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—**

दिनांक ०३/०३/२०१७ चे १७.५५ ते १८.२० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील टाटा मॅजीक क्र. एमएच ३६/एफ ८१२५ ही दारु पिऊन दारुचे नशेत चालवितांना व सोबत लायसन्स न बाळगता मिळुन आल्याने त्याचे ब्रीथ अल्कोहोल ॲनालायजर मशीनव्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके वानीशा भंडारा याचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १८५,१३०(१)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—**

दिनांक ०३/०३/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर रस्त्याने आडवे तिडवे दारु पिऊन दारुचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे प्राथमीक आरोग्य केंद्र अडयाळ येथे वैदयकीय तपासणी केली असता डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) गैरकायदयाची मंडळी तयार करुन आदेशाचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०३/२०१७ चे ०९.०० ते १७.०० वा. दरम्यान यातील पाचही आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करुन परसवाडा गावातील जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक ए. एम. हलमारे याची प्रशासकीय कारणा वरुन झालेली बदली रद्द करुन त्यांना पुन्हा शाळेत नियुक्त करा या कारणा वरुन शाळेच्या गेटला ताला लावुन शाळेचे विदयार्थी शिक्षक यांना आत जाण्यास मज्जाव करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केले व मा. जिल्हा अधीकारी साहेब यांचे कलम ३७(१)(३) म.पो.का अन्वये मनाई आदेशाचे उल्लघंन केल्याने फिर्यादी चंद्रकुमार काशीनाथ नंदवार वय ५५ वर्ष, रा. एलआयजी २२६ न्यु म्हाडा कालोनी भंडारा धंदा नौकरी गटशिक्षण अधीकारी पंचायत समिती तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरुन सिहोरा येथे कलम १४३,१८६,३४१, भादंवि. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रिझवी पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०३/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ९१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.